पनवेल महानगरपालिका

राज्य शासनाचा 150 दिवसाचा कृती आराखडा

ई - गव्हर्नन्स सुधारणा

मंगेश चितळे (भा. प्र. से.)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

1 वेबसाइट अनुपालनासाठी मूल्यांकन
(35 Marks)

१. वेबसाइट वापरकर्ता इंटरफेस

Scan Qr Code of Supporting Document

A पृष्ठ लोड होण्याचा वेग
- 2.4 सेकंद

B
- वेबसाइट सुसंगतता

मोबाइल डिव्हाइस आणि वेब ब्राउझरवर पूर्णतः कार्यरत

C
- शासकीय ब्रँडिंग

वेबसाइटवर महाराष्ट्र शासनाचा लोगो महाDGIPR च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रदर्शित करण्यात आला आहे.

D
- डोमेन अनुपालन

www.panvelcorporation.maharashtra.gov.in

E
- मालकीची माहिती

सर्व पृष्ठांवर पनवेल महानगरपालिकेची मालकी दर्शविणारी माहिती तसेच महानगरपालिकेचा लोगो स्पष्टपणे प्रदर्शित करण्यात आला आहे.

F भाषा समर्थन :

वेबसाइट मराठी व इंग्रजी या द्विभाषिक भाषांमध्ये उपलब्ध आहे.

G
- वेबसाइटवरील भेटींची संख्या

13,67,659

5th Dec 2024 to 10th Jan 2026

1 वेबसाईट अनुरूपता मूल्यांकन
(55 Marks)

2. सुलभता

- वेबसाइट WCAG 2.1 (Web Content Accessibility Guidelines) मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आली आहे.
- दिव्यांग व्यक्तींना वेबसाइट अधिक सुलभ व्हावी यासाठी स्क्रीन रीडर सपोर्ट व व्हॉइस सर्च यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

3. वेबसाईट सुरक्षा अनुरूपता मूल्यांकन व प्रमाणपत्र

A) सायबर सुरक्षा ऑडिट प्रमाणपत्र :

- सायबर सुरक्षा लेखापरीक्षण (Cyber Security Audit) हे CERT-IN मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमार्फत करण्यात आले आहे.
- सुरक्षा प्रमाणपत्र (प्रमाणपत्र क्र.: AKSIT/2024-25/0795) दिनांक २५ मार्च २०२५ रोजी प्राप्त झाले आहे.

B) अनुरूपता मॅट्रिक्स :

- वेबसाइटची GIGW (Guidelines for Indian Government Websites) अनुपालन मॅट्रिक्सनुसार पडताळणी करण्यात आली आहे.

C) नियमित लेखापरीक्षण :

- STQC वार्षिक सर्व्हेलन्ससाठी ई-मेल पाठविण्यात आला आहे.

Sugamya Digital Solutions Pvt. Ltd.
S.N. 86/87/2 B2 502 Treasure Phase II, Kashid Nagar, Pimple Gurav, Pune, Maharashtra, India, 411061
CIN: U72900PN2018PTC176067
Phone: +91 8999662005, Email: info@sugamyadigital.com
https://www.sugamyadigital.com

To Whom It May Concern

This is to certify that the internationally certified accessibility professionals at Sugamya Digital Solutions Pvt. Ltd. have conducted a comprehensive accessibility audit of the website:

https://panvelcorporation.maharashtra.gov.in **of Panvel Municipal Corporation and remediated the same.**

We hereby confirm that, as of **02-JAN-2026**, **the website is compliant with WCAG 2.2 Level AA Guidelines of W3C**.

Sugamya Digital Solutions Pvt. Ltd. assumes full responsibility for any claims of non-compliance, including those raised in a court of law.

This undertaking shall remain valid for a period of one year from the date of issuance.

Suchita Sondkar
IAAP Certified Accessibility Specialist

Dhananjay Bhole
Director

WCAG 2.2 Level AA Certificate

Scan Qr Code of Supporting Document

1 वेबसाईट अनुरूपता मूल्यांकन
(55 Marks)

4. वेबसाईट कंटेंट व्यवस्थापन

A) माहितीची सत्यता

- महानगरपालिकेच्या मालकीचे नसलेले सर्व पुनर्मुद्रित दस्तऐवज स्रोतासह सादर करण्यात आले आहेत.
- यामध्ये संबंधित दस्तऐवजाचे शीर्षक, मालक संस्था आणि प्रकाशन वर्ष यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

B) माहिती अद्ययावतीकरणाची किमान वारंवारिता

- वेबसाइट दर 24 तासांनी नियमितपणे अद्ययावत करण्यात येते.

C) पदाधिकारी व व्यक्तीगत माहिती

- वेबसाइटवर मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री आणि मा. आयुक्त यांची छायाचित्रे उपलब्ध आहेत.
- तसेच, वेबसाइटवर अद्ययावत संघटनात्मक रचना (Organizational Hierarchy) देखील प्रदान करण्यात आली आहे.

D) कन्टेन्ट व्यवस्थापन प्रणाली

Role based कंटेंट मॅनेजमेंट सिस्टीम (CMS) सॉफ्टवेअर प्रणाली तयार करण्यात आली आहे, जी संस्थांना डिजिटल सामग्री तयार करणे, व्यवस्थापित करणे व प्रकाशित करण्याची सुविधा देते तसेच पूर्वनिश्चित वापरकर्ता भूमिकांनुसार कोण कोणती कार्ये करू शकतो यावर नियंत्रण ठेवते.

E) RTI विभाग / नागरिकांची सनद

F) नवीन अपडेट्स सेक्शन

- वेबसाइटवर “नवीन काय आहे” (What’s New) हा विभाग समाविष्ट आहे.
- या विभागामध्ये पनवेल महानगरपालिका (PMC) यांच्या नव्या उपक्रमांबाबतची माहिती, विविध योजना व महत्त्वाच्या फ्लॅगशिप कार्यक्रमांशी संबंधित घोषणा, तसेच नागरिकांसाठी सूचना व अलर्ट्स उपलब्ध करून दिले जातात.

Scan Qr Code of Supporting Document

1 वेबसाईट अनुरूपता मूल्यांकन
(55 Marks)

5. शोध सुविधा कार्यप्रणाली

A
- **Navigation Consisitency**

मेन्यू सहज समजण्यासारखे, सुसंगत असून वापरकर्त्यांचा प्रवास (User Journey) सुरळीत होईल यासाठी सहाय्यक आहेत.

B
- **Sitemap or Content Index**

वेबसाइटवर साइटमॅप उपलब्ध आहे.

C
- **Search Functionality**

माहिती शोधण्यासाठी अनुकूलित शोध कार्य उपलब्ध आहे. व्हॉइस सर्च (Voice to text Input - Output) फिचर उपलब्ध आहे.

6. डेटा आणि ई-गव्हर्नन्स एकत्रीकरण

A) ओपन डेटा नियम / मानके

- हिवाळी हंगामातील स्थलांतरित पक्ष्यांबाबतची माहिती मुख्य डेटा अधिकारी श्रीमती वर्षा पालवे यांच्या लॉगिनद्वारे data.gov.in पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे.
- ही माहिती पर्यटक, वन्यजीव छायाचित्रकार, पक्षी निरीक्षक तसेच पर्यावरणप्रेमी यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

डेटासेटसाठी ODS संकेतस्थळ पाहण्यासाठी क्लिक करा

B) सेवा स्तर डेटा सादरीकरण

- हिवाळी हंगामातील स्थलांतरित पक्ष्यांबाबतची माहिती मुख्य डेटा अधिकारी श्रीमती वर्षा पालवे यांच्या लॉगिनद्वारे data.gov.in पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे.
- ही माहिती पर्यटक, वन्यजीव छायाचित्रकार, पक्षी निरीक्षक तसेच पर्यावरणप्रेमी यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.



Scan Qr Code of Supporting Document

1 वेबसाईट अनुरूपता मूल्यांकन
(55 Marks)

७. अभिप्राय व तक्रार निवारण प्रणाली

A) नागरिकांसाठी उपलब्ध धोरणे

- वेबसाइटवर धोरणे, कॉपीराइट धोरण, गोपनीयता धोरण (Privacy Policy) तसेच अटी व शर्ती (Terms & Conditions) प्रकाशित करण्यात आले आहेत.

B) अभिप्राय यंत्रणा (Feedback Mechanism)

- नागरिकांनी आपला अभिप्राय नोंदविण्यासाठी फीडबॅक प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे वापरकर्ते किंवा नागरिक आपली सूचना व मते महानगरपालिकेसोबत शेअर करू शकतात.
- तसेच, वेबसाइटच्या “Contact Us” विभागामध्ये दूरध्वनी क्रमांक, टोल-फ्री क्रमांक, ई-मेल आयडी आणि पत्ता उपलब्ध करून देण्यात आला आहे.

C) सोशल मीडिया एकत्रीकरण

- वेबसाइटवर Facebook, Instagram आणि X यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सशी एकात्मिक जोडणी (Integrated Connectivity) देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.





Policy Statement

Social Media Integration

Scan Qr Code of Supporting Document

2 आपले सरकार मूल्यांकन

(55 Marks)

1. RTS आणि आपले सरकार यांची सांख्यिकी माहिती :

A) RTS अंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या सेवांची संख्या / महाराष्ट्र शासनाकडून अधिसूचित (Notified) सेवांची संख्या

$$\frac{70}{70} \times 100 = 100\%$$

B) i एकूण ऑनलाइन RTS सेवा / RTS अंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या सेवांची संख्या

$$\frac{70}{70} \times 100 = 100\%$$

B) ii एकूण ऑनलाइन (End to End) RTS सेवा / RTS अंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या सेवांची संख्या

$$\frac{70}{70} \times 100 = 100\%$$

C) आपले सरकारसोबत एकात्मिक (Integrated) केलेल्या RTS सेवांची एकूण संख्या / Number of Notified Services by GOM

$$\frac{67}{70} \times 100 = 97.5\%$$

2. कार्यप्रदर्शन परिणाम (Performance Output)

A) सेवा वितरण कालावधी (SLA पालन)

सर्व सेवांसाठी सरासरी कालावधी (दिवसांत) / सर्व RTS सेवांसाठी प्रत्यक्ष निकाली काढण्याचा सरासरी कालावधी (दिवसांत)

$$\frac{17.79}{18.97} \times 100 = 93.83\%$$

Scan Qr Code of Supporting Document

B) i) RTS साठी अपील व एस्कलेशन व्यवस्था

- वेबसाइटवर प्रथम स्तर व द्वितीय स्तर अपील अधिकारी यांची माहिती उपलब्ध आहे.
- Link : https://www.panvelcorporation.maharashtra.gov.in/assets/document/nagarik.pdf

B) ii) प्रथम व द्वितीय स्तर अपीलांचे विश्लेषण

First Level

प्रथम स्तर अपील दाखल संख्या / एकूण RTS अर्जांची संख्या

$$\frac{1}{21805} \times 100 = 0.001\%$$

Second Level

द्वितीय स्तर अपील दाखल संख्या / एकूण RTS अर्जांची संख्या

$$\frac{0}{21805} \times 100 = 0\%$$

3. Capacity Building / Adoption

A) Officer Training

प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची एकूण संख्या / एकूण पात्र कर्मचाऱ्यांची संख्या

$$\frac{38}{38} \times 100 = 100\%$$

2 आपले सरकारसाठी मूल्यांकन
(55 Marks)

3 B) माहिती, शिक्षण व संवाद आणि जनजागृती उपक्रम (IEC & Outreach)

Social Media





पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

प्रसिद्धीपत्रक

पनवेल महानगरपालिका नागरिकांना पारदर्शक वेगवान आणि सुलभ सेवा पुरविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी पनवेल महानगरपालिका कार्यरत आहे. याचाच भाग म्हणून पनवेल महानगरपालिकेमार्फत पनवेल महानगरपालिकेची अधिकृत वेबसाईट www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईट वरती पनवेल महानगरपालिके मार्फत देण्यात येणाऱ्या ७० लोकसेवांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तरी सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी.

सही-
(कैलास गावडे)
उप आयुक्त (मुख्यालय)
सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र.: पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र. ४७६/४८९/२०२५
/०९/२०२५

Print Media

Website

SMS

Scan Qr Code of Supporting Document

2

आपले सरकारसाठी मूल्यांकन (55 Marks) 〉 4. नागरिक तक्रार निवारण व व्यवस्थापन

A) तक्रार निवारण कालावधी (वेळापत्रक पालन)

पोर्टलचे नाव	एकूण प्राप्त तक्रारींची संख्या	<7 दिवस	7 - 14 दिवस	14 – 21 दिवस	21 – 30 दिवस	Avg days of Closure
आपले सरकार	770	588	118	16	8	4
PG पोर्टल	200	173	14	1	4	5
पनवेल कनेक्ट – तक्रार निवारण	9547	5747	1157	610	459	23
एकूण	10517	6508	1289	627	471	32
Average Days of Closure	11 Days					

B) (I) सर्व पोर्टल्सवर तक्रार वाढ (Grievance Escalation) सुविधा उपलब्ध आहे
B) (II) तक्रार वाढ (Grievance Escalation)

पोर्टलचे नाव	एकूण प्राप्त तक्रारी	Escalated तक्रारी
आपले सरकार	770	9
PG पोर्टल	200	0
पनवेल कनेक्ट – तक्रार निवारण	9547	195
एकूण	10517	204
	Escalated तक्रारींची टक्केवारी	2%

$$\frac{\text{एकूण Escalated तक्रारींची संख्या}}{\text{एकूण निकाली काढलेल्या तक्रारींची संख्या}} \quad \frac{204}{10517} \times 100 = 2\%$$

C) निकाली काढलेल्या तक्रारींबाबत तक्रारदारांकडून प्राप्त अभिप्राय :

पोर्टल	एकूण प्राप्त अभिप्राय	एकूण प्राप्त स्टार्स	१० गुणांच्या प्रमाणात काढलेली सरासरी
आपले सरकार + PG पोर्टल + पनवेल कनेक्ट – तक्रार निवारण	1118	10351	9.26

Scan Qr Code of Supporting Document

2 आपले सरकारसाठी मूल्यांकन
(55 Marks)

4. नागरिक तक्रार निवारण व व्यवस्थापन
D) Citizens Grievance Data Analatyics



भूतकाळातील डेटाचे विश्लेषण (Retrospective Analytics)

या चार्टमध्ये जानेवारी २०२५ मधील दैनंदिन तक्रारींचा नमुना दर्शविण्यात आला आहे. प्राप्त तक्रारींची संख्या निकाली काढलेल्या तक्रारींपेक्षा सातत्याने अधिक दिसते. मात्र महिन्याच्या शेवटी हा फरक कमी होताना दिसतो, यावरून तक्रार निवारणाचा वेग व कार्यक्षमता वाढल्याचे सूचित होते.

भविष्यकालीन अंदाजानुसार विश्लेषण (Predictive Analysis)

- या चार्टमध्ये कालानुक्रमे प्रत्यक्ष तक्रारी आणि अंदाजित तक्रारी यांची तुलना करण्यात आली आहे.
- प्रत्यक्ष तक्रारींमध्ये चढउतारांसह वाढता कल दिसून येतो आणि २०२५ च्या अखेरीस त्यांचा उच्चांक दिसतो.
- अंदाजानुसार २०२६ च्या सुरुवातीपासून तक्रारींच्या संख्येत सतत वाढ होण्याची शक्यता दर्शविण्यात आली आहे.

नमुना डेटा आधारित विश्लेषण (Inferential Analytics)

- या विश्लेषणामध्ये विविध महानगरपालिका विभागांना तक्रारी निकाली काढण्यासाठी लागणारा सरासरी कालावधी (दिवसांत) दर्शविण्यात आला आहे.
- रस्ते, बांधकाम व खड्डे विभाग यांचा सरासरी निवारण कालावधी ४२ दिवस असून तो सर्वाधिक असल्याने विलंब जास्त असल्याचे दिसते.
- वृक्ष प्राधिकरण सर्वात जलद कार्यरत असून त्यांचा सरासरी कालावधी १२ दिवस आहे, तर इतर विभागांचा कालावधी साधारणपणे २० ते २९ दिवसांदरम्यान आहे.

Scan Qr Code of Supporting Document

3 ई-ऑफिस अनुपालन मूल्यांकन
(35 Marks)

1. E Office Statistics

A) ई-ऑफिस वापरकर्त्यांची संख्या

ई-ऑफिस वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या / ई-ऑफिस वापरण्यास पात्र कर्मचाऱ्यांची संख्या = 267 / 267 x 100 = **100%**

B) सक्रिय ई-ऑफिस वापरकर्त्यांची संख्या

सक्रिय ई-ऑफिस वापरणारे कर्मचारी / ई-ऑफिस वापरण्यास पात्र कर्मचाऱ्यांची संख्या = 267 / 267 x 100 = **100%**

C) ई-ऑफिसद्वारे फाईल निपटारा (Disposal)

निपटारा करण्यात आलेल्या फाईल्सची संख्या / तयार करण्यात आलेल्या फाईल्सची संख्या = 9399 / 10942 = **85.89%**

D) फाईल निपटारा कालावधी (Disposal Time)

- **Average 48.38 Days**

E) Reciept Inward in E - Office

एकूण Dispose केलेल्या Receipts ची संख्या / एकूण तयार झालेल्या Receipts ची संख्या = 45630 / 46624 = **97.86%**

२. GPR द्वारे प्रक्रिया सुलभीकरण

A) GPR साठी राबविलेल्या प्रक्रिया

प्रक्रिया १ : मंजुरीच्या टप्प्यांची संख्या कमी करणे

स्पष्टीकरण : पूर्वी फाईल अनेक टेबलांवरून पुढे जात असे. प्रत्येक टप्प्यामुळे विलंब वाढत असे तसेच पुनरुक्ती किंवा चुका होण्याची शक्यता अधिक होती.

महत्त्वाचे नसलेले तपासणी टप्पे एकत्रित करण्यात आले आहेत किंवा स्वयंचलित (ऑटोमेटेड) करण्यात आले आहेत.

उदाहरण : पूर्वी इमारत परवानगीसाठी ८ स्वाक्षऱ्यांची आवश्यकता होती, आता फक्त ४ मंजुरी आवश्यक आहेत — तांत्रिक तपासणी, कायदेशीर अनुपालन, आर्थिक तपासणी आणि अंतिम मंजुरी.

कारणमीमांसा :

- फाईलची अनावश्यक हालचाल कमी होते
- हस्तचलित तपासणीमुळे होणारा विलंब कमी होतो
- जबाबदारी स्पष्टपणे निश्चित झाल्याने उत्तरदायित्व वाढते

परिणाम : निर्णय प्रक्रिया अधिक जलद होते आणि सेवा पुरवठा अधिक प्रभावी होतो.

प्रक्रिया २ : फाईल पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या निर्धारित कालावधीत कपात

स्पष्टीकरण : प्रक्रियेत सुधारणा केल्यानंतर कालमर्यादा पुनर्रचित करण्यात आल्या आहेत. समांतर प्रक्रिया (Parallel Processing), डिजिटल कार्यप्रवाह आणि पूर्वनिश्चित नमुने (Templates) यांचा वापर केल्यामुळे अधिकारी अधिक जलद कार्य करू शकतात.

उदाहरण : पूर्वी एखाद्या परवान्यासाठी ३० दिवस लागत असत, तर प्रक्रिया सुलभीकरणामुळे आता तोच परवाना १० ते १५ दिवसांत पूर्ण केला जातो.

कारणमीमांसा :

- नागरिकांना वारंवार पाठपुरावा करावा लागत नाही
- विभागांवर पडणारा प्रलंबित कामाचा ताण (Backlog) कमी होतो
- पारदर्शकता वाढते आणि नागरिकांचा विश्वास दृढ होतो

परिणाम : नागरिक सेवांचा पुरवठा अधिक जलद आणि प्रभावी होतो.

Scan Qr Code of Supporting Document

3 ई-ऑफिस अनुपालन मूल्यांकन

(35 Marks)

प्रक्रिया ३ : आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणे

स्पष्टीकरण : आता फक्त कायदेशीरदृष्ट्या आवश्यक असलेली कागदपत्रेच मागविण्यात येतात. शक्य तिथे आधार, मालमत्ता नोंदी, कर नोंदी यांसारख्या शासकीय डेटाबेसमधून माहिती थेट प्राप्त केली जाते.

उदाहरण : पूर्वी खालील कागदपत्रांची आवश्यकता होती —

ओळखपत्र, रहिवासी पुरावा, स्वघोषणापत्र, प्रतिज्ञापत्र

आता केवळ ओळखपत्र आणि स्वघोषणापत्र इतकीच कागदपत्रे आवश्यक आहेत.

कारणमीमांसा :

- नागरिकांवरील कागदपत्रांचा ताण कमी होतो
- त्याच नोंदी वारंवार सादर करण्याची गरज राहत नाही
- छपाई, नोटरी आणि प्रवास खर्चाची बचत होते

परिणाम : प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि नागरिकाभिमुख बनते.

प्रक्रिया ४ : सर्व अधिकृत अधिकाऱ्यांकडून DSC (डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र) चा वापर

स्पष्टीकरण : आता सर्व मंजुरी देणारे अधिकारी कागदी दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याऐवजी डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रे (DSC) वापरून फाईल्सवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्वाक्षरी करतात.

उदाहरण : अधिकारी ई-ऑफिस प्रणालीमध्ये लॉगिन करून डिजिटल फाईल तपासतात आणि DSC द्वारे सुरक्षितपणे स्वाक्षरी करतात. त्यामुळे फाईल कायदेशीरदृष्ट्या वैध, वेळ-मुद्रांकित (Time stamped) आणि छेडछाड न होणारी (Tamper-proof) बनते.

कारणमीमांसा :

- मंजुरींची प्रामाणिकता व कायदेशीर वैधता सुनिश्चित होते
- स्वाक्षरी केलेल्या दस्तऐवजांत बदल किंवा गैरवापर होण्यास प्रतिबंध होतो
- पूर्णतः डिजिटल व कागदविरहित (Paperless) कार्यप्रवाह शक्य होतो
- वेळेची बचत होते — अधिकारी कोणत्याही ठिकाणाहून फाईल मंजूर करू शकतात

परिणाम : सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासन सुनिश्चित होते.

२. GPR द्वारे प्रक्रिया सुलभीकरण

B) Rationalisation of Stages

E Office प्रणाली वरून घेतलेल्या रिपोर्ट्सनुसार

Average File processing stages (Start to close) = 3.795

Sr. No.	Period	Average Distinct Level (Closed Files)
A	01/05/2025 to 30/09/2025	4.03
B	01/10/2025 to 10/01/2026	3.56
	Average (A and B)	3.795

Scan Qr Code of Supporting Document

3 ई-ऑफिस अनुपालन मूल्यांकन
(35 Marks)

३. क्षमता विकास आणि स्वीकार (CapacityBuilding and Adoption)

A) अधिकारी प्रशिक्षण :

$$\frac{\text{प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या}}{\text{एकूण प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या}} \quad \frac{267}{267} \times 100 = \mathbf{100\%}$$



B) ई-ऑफिसचे तांत्रिक सहाय्यक :

1. करण भोईर – ७९७७७८२४१८ – karan.bhoir15@mah.gov.in
2. निलेश माने – ८६५५४००२५१ – nileshmane51@gmail.com

4. ज्ञान व्यवस्थापन प्रणाली

- KMS मध्ये अपलोड केलेल्या फाईल्सची संख्या : 278

Scan Qr Code of Supporting Document

4 डॅशबोर्ड अनुपालन मूल्यांकन
(20 Marks)

1.वापर सुलभता व वापरकर्ता अनुभव / स्पष्टता आणि साधेपण

A — Design and Development of Dashboard

डॅशबोर्ड दृश्यदृष्ट्या आकर्षक व समजण्यास सोपा असून कामाच्या प्रगतीचे संपूर्ण (समग्र) चित्र स्पष्टपणे सादर करतो.



B — Interactive Interface

डॅशबोर्ड वापरकर्त्यास अनुकूल असून स्पष्ट नेव्हिगेशन आणि तार्किक मांडणी (Logical Layout) यामुळे वापरण्यास सुलभ आहे.

C — Data Visualization / Customizability

चार्ट्स व ग्राफ्स सानुकूल करण्यायोग्य, स्पष्ट असून महत्त्वाचे शासकीय मापदंड (Key Government Metrics) प्रभावीपणे दर्शवतात.

D — Data filtering and Segmentation

डॅशबोर्डमध्ये वेळ, तारीख, विभाग आणि प्रगती या निकषांनुसार फिल्टरिंग व वर्गीकरण (Segmentation) करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

Scan Qr Code of Supporting Document

4 डॅशबोर्ड अनुपालन मूल्यांकन
(20 Marks)

2. डेटा अद्ययावतता व अचूकता

A) मा. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण पूर्ण करण्यात आले आहे

B) केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाच्या योजना / कार्यक्रमांची माहिती दर्शविणारा डॅशबोर्ड :
केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रगती डॅशबोर्डवर दृश्य स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या डॅशबोर्डमध्ये खालील योजनांचा समावेश आहे :

- DAY–NULM (दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान)
- AMRUT 2.0 (अटल मिशन फॉर रीजुव्हेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन)
- PM SVANidhi (प्रधानमंत्री स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी योजना)
- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)

PM SVANidhi

DAY-NULM
Deendayal Antyodaya Yojana-National Urban Livelihoods Mission

अमृत 2.0
Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation

C) डेटा अद्ययावतता व अचूकता :
वापरकर्ता विभागाच्या MIS मधून माहिती घेऊन आठवड्याला डेटा अद्ययावत करण्यात येतो, ज्यामुळे माहितीची अचूकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित होते.

D) भूमिकेनुसार प्रवेश नियंत्रण (Role Based Access Control) :
कंटेंट मॅनेजमेंट सिस्टीम (CMS) आणि MIS च्या माध्यमातून भूमिकानुसार प्रवेश नियंत्रण सुविधा प्रदान करण्यात आली आहे.

3. Data Maturity

A) डेटा ॲनालिटिक्स परिपक्वता (Data Analytics Maturity) :
डॅशबोर्डवर Inferential, Retrospective आणि Predictive प्रकारचे डेटा ॲनालिटिक्स वापरण्यात येत असून त्याद्वारे सखोल विश्लेषण व भविष्यातील अंदाज उपलब्ध होतात.

B) कार्यप्रदर्शन पॉप-अप्स / अनुपालन अलर्ट :
पॉप-अप सुविधा उपलब्ध असून त्याद्वारे रिअल-टाइम अद्ययावत माहिती तसेच मर्यादा (Threshold Value) नुसार सूचना दर्शविण्यात येतात.

Inferential data analytics



Retrospective data analytics



Predective data analytics



Scan Qr Code of Supporting Document

4 डॅशबोर्ड अनुपालन मूल्यांकन
(20 Marks)

4. सुलभता

बहुउपकरण सुसंगतता :

- डेस्कटॉप
- टॅब्लेट
- मोबाईल



5. क्षमता वृद्धी

- अधिकारी प्रशिक्षण

पात्र अधिकारी संख्या		एकूण पात्र अधिकारी संख्या	एकूण प्रशिक्षण देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची संख्या	% of training of Employee
वर्ग १	वर्ग २			
23	11	34	34	100 %

Scan Qr Code of Supporting Document

5 व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट मूल्यांकन

(20 Marks)

1. वापर सुलभता व नागरिक अनुभव

A) वापरण्याची सुलभता

- **स्टेप १ :** WhatsApp आयकॉनवर क्लिक केल्यानंतर प्रणाली थेट WhatsApp वर रीडायरेक्ट होते, जिथे “Hello, I need help” असा पूर्वनियोजित संदेश दिसतो. (संदर्भासाठी प्रतिमा पहा)
- **स्टेप २ :** चॅटबॉट आपोआप वापरकर्त्याला नागरिक सेवांची यादी निवडण्यास मदत करतो. (संदर्भासाठी प्रतिमा पहा)
- **स्टेप ३ :** वापरकर्त्याने पर्याय निवडल्यानंतर, उपलब्ध असलेल्या सर्व सेवांची यादी दिसते आणि वापरकर्ता आपल्या गरजेनुसार सेवा निवडू शकतो.

B) बहुभाषिक समर्थन (Multilingual Support)

- चॅटबॉट मराठी व इंग्रजी या द्विभाषिक भाषांमध्ये उपलब्ध आहे.

C) संदेशवहन व प्रसारणाद्वारे नागरिक सहभाग (IEC आणि Outreach उपक्रम)

- स्वच्छ भारत मिशन आणि माझी वसुंधरा अभियान अंतर्गत उपलब्ध सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आउटरीच यंत्रणेद्वारे सुमारे २,५०,००० व्हॉट्सअ‍ॅप संदेश नागरिकांना पाठविण्यात आले आहेत.

Whatsapp Chat Bot number : 8960916091

2. Service Delivery and functionality

A) Service Coverage

$$\frac{\text{Total RTS Services on Wahtsapp}}{\text{Total RTS Services for the Department}} \quad \frac{70}{70} \times 100 = \mathbf{100\%}$$



2. B) Handling of Citizen Queries

- Fallback options for unrecognised inputs is available.

3. Accessibility

A) Cross Platform Access

- चॅटबॉट iOS, Android आणि Web वरील WhatsApp प्लॅटफॉर्मवर सातत्याने व समान कार्यक्षमतेने कार्यरत आहे.

4) Innovation :

Click Here for POC of Whatsapp chatbot Innovation

Scan Qr Code of Supporting Document

6 AI / ब्लॉकचेन अनुपालनासाठी मूल्यांकन
(15 Marks)

A) विभाग / संस्थेमार्फत संकल्पनात्मक दस्तऐवजीकरण :

- नागरिक सेवांसाठी करमित्र AI चॅटबॉट बाबत संकल्पनात्मक दस्तऐवजीकरण तयार करण्यात आले आहे. यामध्ये कर भरणे, बिल डाउनलोड, तक्रार नोंदणी, दस्तऐवज डाउनलोड, तक्रार ट्रॅकिंग तसेच मालमत्ता कराची माहिती अशा सेवांचा समावेश आहे.

B) उपलब्ध GenAI साधने / प्लॅटफॉर्मचा मूलभूत वापर :

- करमित्र AI चॅटबॉट हा GenAI/NLP, ChatGPT आणि Gemini प्लॅटफॉर्मचा वापर करून विकसित करण्यात आला आहे. यामुळे मालमत्ता कर सेवांसाठी संवादात्मक (Conversational) इंटरफेस उपलब्ध होतो. नागरिक कोणत्याही हस्तचलित हस्तक्षेपाविना नैसर्गिक संवादातून सेवा घेऊ शकतात.

C) AI / Blockchain च्या वापरातून राबविण्यात आलेल्या युज केसेसची संख्या :

1. कर भरणे
2. सवलतीसाठी अर्ज
3. बिल डाउनलोड
4. तक्रार नोंदणी
5. दस्तऐवज डाउनलोड
6. तक्रार ट्रॅक करणे
7. मालमत्ता कराची माहिती मिळवणे

AI करमित्रचा डेमो व्हिडिओ पाहण्यासाठी खाली क्लिक करा :

- **Click Here**

Scan Qr Code of Supporting Document

6 AI / ब्लॉकचेन सुसंगतता मूल्यांकन
(15 Marks)

D) AI / Blockchain वापराचा परिणाम (Impact Analysis)

- डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून लाभार्थी नागरिक : 5,764
- करमित्र द्वारे कर भरणारे नागरिक : 395
- डिजिटल माध्यमातून संकलित कर रक्कम : ₹1,15,84,832

i. किफायतशीर (Cost Effective)

कार्य	करमित्र सुरू होण्यापूर्वीचा सरासरी कालावधी	करमित्र अंमलबजावणीनंतरचा सरासरी कालावधी
नागरिकांचे कार्यालयात येणे	30–60 मिनिटे	0 मिनिटे
सेवा काउंटरवरील संवाद	8–12 मिनिटे	0 मिनिटे
मॅन्युअल नोंद तपासणी	5–10 मिनिटे	0 मिनिटे
प्रती नागरिक लागणारा एकूण कर्मचारी वेळ	15 मिनिटे	0 मिनिटे

कार्य	मूल्य
प्रति चौकशी सरासरी वाचलेला कर्मचारी वेळ	15 मिनिटे
कर्मचारी वेळेची एकूण बचत	86,460 मिनिटे
एकूण कर्मचारी वेळेची बचत	1507 तास
८ तास/दिवस प्रमाणे कर्मचारी दिवस	180 कर्मचारी दिवस
५७६४ नागरिकांच्या चौकशीसाठी एकूण मानवी संसाधन खर्च बचत	1507 तास × ₹250 = ₹3,76,750

ii. शाश्वतता (Sustainable)

- ५,७६४ नागरिकांनी प्रत्यक्ष कार्यालय भेटी टाळल्या.
- कागद वापर (फॉर्म, पावती, नोटिस) कमी झाला.
- वाहतुकीमध्ये इंधन वापर आणि संबंधित वाहन उत्सर्जन कमी झाले.
- भौतिक कागद नष्ट होतो, परंतु करमित्र प्रणाली पूर्णपणे डिजिटल असल्यामुळे डेटा व नोंदी कायमस्वरूपी जतन होतात.
- कागदविहीन प्रशासनाला प्रोत्साहन मिळते.
- नागरिकांना २४×७ जलद आणि तात्काळ सेवा उपलब्ध होते.
- डिजिटल इंडिया च्या उद्दिष्टांशी सुसंगत

iii. प्रमाण वाढवता येण्याजोगे (Scalable)

- अतिरिक्त महानगरपालिका सेवा विस्तारासाठी सक्षम.
- नागरिकांचा कव्हरेज रेखीय वाढीने (Linear Growth) करता येथे व त्याकरिता (अतिरिक्त मनुष्यबळ) कर्मचाऱ्यांची संख्या त्यानुसार वाढण्याची गरज नाही.
- नागरिकांच्या चौकशींसाठी व्हॉइस असिस्ट फिचर उपलब्ध करून देता येईल.
- कमी अतिरिक्त संचालन खर्च असून उच्च प्रमाण वाढवता येण्याजोगे.

Scan Qr Code of Supporting Document

7 GIS नियमांशी सुसंगत मूल्यमापन
(20 Marks)

GIS / रिमोट सेन्सिंग / लोकेशन सेवा

A) GIS अंमलबजावणीपूर्वी डेटाबेसचा वापर

NSIL - ISRO, उपग्रह प्रतिमा प्राप्त – Pleiades, Cartosat-2, आणि Cartosat-2D.

B) विभाग / संस्थेकडून संकल्पनेचा पुरावा (Proof of Concept)

विभागाकडून POC पूर्ण केले गेले असून त्याची माहिती QR कोडसह संलग्न आहे.

GIS कार्यप्रणालीचा प्रतिनिधित्वात्मक तक्ता



C) तयार केलेल्या GIS लेयर्सची संख्या (कमाल गुणांसाठी 20 GIS लेयर्स)

1) विभाग (Division)
2) वार्ड सीमा (Ward Boundary)
3) प्रभाग (Prabhag)
4) गाव (Village)
5) सेक्टर (Sector)
6) भूखंड (Plot)
7) गाव सर्वेक्षण (Village Survey)
8) पनवेल CIDCO अधिकारक्षेत्र
9) पनवेल नगररचना अधिकारक्षेत्र
10) रस्त्यांचे जाळे (Road Network)
11) रेल्वे जाळे (Railway Network)
12) झाडे (Tree)
13) मँग्रोव्ह क्षेत्र (Mangrove Area)
14) पाण्याचे तळे / जलस्रोत (Water Bodies)
15) एकूण बांधकाम क्षेत्र (२०१९) (Total Built-up 2019)
16) बांधकामातील बदल (Built-up Change)
17) अधिकृत इमारती (Authorised Buildings)
18) अनधिकृत इमारती (Unauthorised Buildings)
19) शेड्स (Sheds)
20) समोच्च रेषा (Contours)
21) नद्या / नाले जाळे (Stream Network)



Scan Qr Code of Supporting Document

7 GIS नियमांशी सुसंगत मूल्यमापन

(20 Marks)

D) GIS (भौगोलिक माहिती प्रणाली) च्या वापरातून अंमलात आणलेल्या उपयोग प्रकरणांची संख्या

- कालानुक्रमिक प्रतिमा संकलन (सहा महिन्यांतून एकदा)
- इमारतींमधील बदल (वर्षातून दोन वेळा)
- टाउन प्लॅनिंगचे इमारत फूटप्रिंटशी एकत्रीकरण
- इमारतींचे वर्गीकरण (अधिकृत, अनधिकृत, शेड्स, मान्यतेसाठी प्रलंबित आणि इतर प्राधिकरण)
- अंदाजे झाडांची संख्या
- भू-स्थानिक माहितीचे दृश्यीकरण करण्यासाठी जिओपोर्टल
- गुगल मॅप लिंकसह अतिक्रमण इमारतींचा अहवाल तयार करणे

E) गतीशक्ती उपक्रमाशी एकात्मिकरण (Integration with Gati Shakti)

गतीशक्तीशी एकदिशात्मक एकत्रीकरण उपलब्ध आहे.

PM Gati Shakti
National Master Plan for Multi-Modal Connectivity

Scan Qr Code of Supporting Document

F) नाविन्यपूर्ण उपयोग प्रकरणे (Innovative Use Cases)

१) नव्याने बांधलेल्या इमारतींचे निष्कर्षण – उपग्रह प्रतिमांच्या सहाय्याने नव्याने बांधलेल्या इमारतींची ओळख व त्यांचे नकाशीकरण करणे.

२) अतिक्रमण शोध व निरीक्षण – शासकीय जमीन, जलस्रोत, रस्ते व मोकळ्या जागांवरील अतिक्रमण उपग्रह प्रतिमा व कॅडस्ट्रल ओव्हरलेच्या सहाय्याने ओळखणे व निरीक्षण करणे.

३) नगररचना (Town Planning) डेटासेट संलग्नता – ओळखण्यात आलेल्या प्रत्येक इमारतीशी संबंधित नगररचना डेटासेट जोडणे.

४) कायदेशीर स्थितीची पडताळणी – नगररचना विभागामार्फत इमारतींना अधिकृत बांधकाम परवानगी प्राप्त आहे की नाही याची पडताळणी करणे.

५) रस्ते जाळे (Road Network) – शहरी नियोजन व वाहतूक व्यवस्थापनासाठी रस्ते जाळ्याचे विश्लेषण, पायाभूत सुविधा सुधारणा व रस्ता जोडणीतील त्रुटी ओळखणे.

६) पाणीपुरवठा नेटवर्क बिंदू – पाणी प्रवेश व निर्गमन बिंदू नकाशीकरण करणे, पाइपलाईन, दाब घट (Pressure Drop) व गळती (Leakage) बिंदू ओळखणे.

७) सांडपाणी नेटवर्क बिंदू – मॅनहोल व तपासणी कक्ष (Inspection Chambers) ओळखणे व तपासणी करणे.

८) सार्वजनिक उपयुक्तता मालमत्ता व्यवस्थापन – पावसाळी निचरा व्यवस्था, पाणीपुरवठा पाइपलाईन, सांडपाणी नेटवर्क व सार्वजनिक इमारती यांचा GIS आधारित मालमत्ता साठा तयार करून देखभाल नियोजन व मालमत्ता ट्रॅकिंग करणे.

९) मालमत्ता कर मूल्यांकन व महसूल नकाशीकरण – अवकाशीय (Spatial) डेटा व मालमत्ता नोंदी एकत्रित करून कर नोंदणीत नसलेल्या मालमत्ता ओळखणे व महानगरपालिकेचा महसूल वाढविणे.

या कार्यालयाची सादरीकरण (Presentation) तयार करण्यासाठी Gamma, Visily, Beautiful.ai, Genspark, Pitch, Canva इत्यादी AI साधनांचा वापर करण्यात आला आहे का?

- होय, या कार्यालयाचे सादरीकरण तयार करण्यासाठी Canva टूलचा वापर करण्यात आला आहे.
- एडिटर (Editor) विंडोचा स्क्रीनशॉट खाली जोडण्यात आला आहे.